शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जयदीप कवाडे यांनी घेतली भेट

शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व परभणी येथील भीमसैनिकावरील गुन्हे परत घेण्याची केली मागणी

नागपूर । प्रतिनिधी

परभणी येथील झालेल्या संविधान प्रतिकृती विटंबना,तसेच तुरूंगा मध्ये भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा झालेला मृत्यु ची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना शासनाने ५० लाखाची आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीस सरकारी नोकरीत घेण्यात यावे अशी अग्रही मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळा चे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांनी आज नागपुर येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

परभणी येथे १० डिसेंबर ला सायं ५ वाजता जातीयवादी मानसिकता असलेल्या एकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान पुस्तिकेचे प्रतिकृती ची विटंबना केली असून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये या निंदनीय घटनेबाबत आंबेडकरी समाजा मध्ये तीव्र असंतोष उफळून आलेला आहे. तसेच आंदोलना मध्ये अटक झालेले भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा तुरूंगा मध्ये झालेला मृत्यु ची सखोल चौकशी करण्यात यावी.

परभणी येथे या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी जनता न्याय मागन्यासाठी रसत्यावर उत्तरली. परभणी बंद च्या आंदोलनात १०० हुन अधिक आंबेडकरी कार्यकर्त्यांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले.

निवेदना मार्फ़त आपल्याला महाराष्ट्रतील तमाम आंबेडकरी जनते च्या वतीने अशी आग्रही मागणी केली. परभणी येथील झालेल्या या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व आंबेडकरी कार्यकर्त्यांवर जे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहे ती मागे घेण्यात यावी तसेच पोलिसांनी सुरु केलेले कॉम्बिंग ऑप्रेशन लगेच थांबवण्यात यावे या मागणीसाठी भेट घेऊन निवेदन देऊन कारवाई करण्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. *यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे मराठवाडा महासचिव तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त अनिल तुरुकमारे प्रामुख्याने उपस्थित होते.

केज शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी नगरपालिकेचा दर्जा द्यावा : आ नमिता मुंदडा यांची विधिमंडळात मागणी

केज । प्रतिनिधी

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने अस्तित्वात असलेली नगरपंचायत नागरिकांना सुविधा देण्यात कमी पडत आहे विकासाचे प्रश्न मि ळणाऱ्या तोकड्या निधीमुळे प्रलंबित आहेत म्हणून केजला नगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी आ नमिता मुंदडा यांनी विधिमंडळात केली आहे

• सासूने नगरपंचायत आणली तर सून नगरपालिका आणणार

दरम्यान २००९ मध्ये कै विमलताई मुंदडा यांनी केलेल्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे केजला नगरपंचायतीचा दर्जा मिळाला होता त्यामुळे शहराच्या प्रगतीची दारे खुली झाली होती आता सासूच्या पावलांवर पाऊल टाकत आ नमिता मुंदडा यांनी शहराला नगरपालिकेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

२००९ साली केजच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगर पंचायतीमध्ये झाले त्यावेळी केजच्या विकासाला चालना मिळेल असा अंदाज होता परंतु तसे होत नसल्यामुळे शहराच्या विकासाची अनेक प्रश्न प्रलंबित राहिली आहेत त्यातच आता शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे त्यामुळे निधीची कमतरता दिसू लागली आहे नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्यातही नगरपंचायत अपुरी पडत आहे त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हीच बाब लक्षात घेत आ नमिता मुंदडा यांनी शहराच्या विकासाची दारे खुली व्हावेत यासाठी विधिमंडळात केजला नगरपालिकेचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली आहे

बीड : शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या वतीने मौजवाडी येथील प्रसिद्ध जागृत दत्त मंदिर येथे दत्त जयंती निमित्त कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून दत्त मंदिर येथे पाच लक्ष रुपये सभा मंडपासाठी जाहीर करण्यात आले यावेळी उपस्थित भाऊसाहेब डावकर, युवा सेना तालुका अधिकारी बारीकराव येवले, मौजवाडीचे सरपंच तेजाब चव्हाण, मौजवाडीचे माजी सरपंच रामनारायण जाधव, बाळू कुटे, बाबू येवले असंख्य भाविक भक्त व गावकरी मंडळी उपस्थित होते.

माजलगावात आर्ष योग संस्थानचे दि.२५ पासून योग शिबीर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील आर्ष योग संस्थानचे वतीने दि.२५ ते ३१ डिसेंबर दरम्यान योग शिबिर व् शंख प्रक्षालन आयोजन करण्यात आले असून त्यात इच्छुकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

येथील आर्ष योग संस्थानच्या वतीने योग संबंधित कार्यक्रम घेतली जातात.बुधवार दि.२५ ते मंगळवार ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये या वर्षातील योग शिबीर येथील वैष्णवी मंगल कार्यालयात घेण्यात येणार आहे. हे मोफत शिबिरआहे. प्रौढासाठी सकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत होणार आहे.तर मुलांचे शिबीर सायंकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत होणार आहे. रविवार दि.२९ रोजी शंखप्रक्षालन



क्रिया सकाळी साडेआठ ते दुपारी एक वाजेपर्यंत राहील . हे शिबीर मधुमेह,उच्च रक्तदाब, वजन व आम्लपित्त असना-यासाठी विशेष उपयोगी आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिरात सहभागी व्हावे त्यासाठी नोंदणी ७५८८५९६१९५ या क्रमांकावर करावी असे आवाहन केले आहे.

मंत्रिपदापेक्षा भाजपाची संघटनशक्ती वाढवण्याला रवींद्र चव्हाण यांचे प्राधान्य

भाजपा हीच आपली ओळख सांगत मंत्रिपदावरून नाराज नसल्याचे चित्र

पुणे । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी हीच आपली ओळख असून, मंत्रिपदापेक्षा पक्षाची संघटनशक्ती वाढवणे अधिक महत्वाचे आहे. त्यामुळे मंत्रिमंडळात समावेश झाला, की नाही याला फार महत्व नाही. भाजपाला अधिक बळकट करण्यासाठी निष्ठेने यापुढे काम करत राहणार असून, पक्षनिष्ठेला प्राधान्य असल्याचे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, आमदार रवींद्र चव्हाण यांनी दाखवून दिले आहे.

महायुती सरकारमध्ये यावेळी मंत्रिमंडळात अनेक नविन प्रॉमिसिंग चेहऱ्यांना संधी देताना काही अनुभवी, मातब्बर नेत्यांना वगळण्यात आल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या २-३ दिवसांपासून नाराजीनाट्य

सुरु आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस तीनही पक्षातील नेत्यांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवली आहे. सुधीर मुनगंटीवार, संजय कुटे, छगन भुजबळ, तानाजी सावंत, नरेंद्र भोंडेकर यांच्यासह इतरांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी एकसंध असणाऱ्या महायुतीमध्ये आता मंत्रिमंडळ आणि खातेवाटपावरून भूकंप होतो का? याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. परंतु या नाराजीनाट्याला देवेंद्र फडणवीस यांचे राइट हँड रवींद्र चव्हाण अपवाद ठरले आहेत.

सरकारमधील असो किंवा पक्ष संघटनेच्या दृष्टीने, गेल्या काही वर्षांतील रवींद्र चव्हाण यांची काम गिरी निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या ऐतिहासिक विजयात देवेंद्र फडणवीस यांच्या खालोखाल रवींद्र चव्हाण यांचे योगदान असल्याचीही चर्चा झाली. मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपम धील चर्चेत असलेल्या नावांमध्ये चव्हाण यांचे नाव आघाडीवर होते. मुख्यमंत्रीपदी फडणवीस निश्चित झाल्यानंतर त्यांच्या 'सुपर कॅबिनेट' मधील एक प्रमुख नाव म्हणून रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाहिले जात असताना त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. तरीही चव्हाण यांच्याकडून कुठल्याही प्रकारे नाराजीचा सूर उमटला नाही. त्यामुळे त्यांच्या पक्षनिष्ठेची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. नागपूर येथील विधानभवन परिसर, भाजपा विधीमंडळ कार्यालय येथे अनेक मंत्री, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यासोबत रवींद्र चव्हाण अतिशय खेळीमेळीने वागत आहेत. त्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवरही कोणतीही नाराजी दिसून आली नाही. अतिशय शांततेत आधीचा बायो बदलून त्याजागी 'आमदार, डोंबिवली शहर' इतकेच लिहिले आहे.

बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतर्फे क्रीडा व्यक्तिमत्व विकास स्पर्धेतील विजयी स्पर्धाकांना बक्षीस वितरण

विदेशी पाहुण्यांकडून शाळेचे व शिक्षकांचे कौतुक

रायगड । प्रतिनिधी

रायगड जिल्हा परिषद आयोजित व पंचायत समिती खालापूर अंतर्गत खालापूर बीटस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे १७ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या.या स्पर्धांमध्ये वडगाव शाळेने घवघवीत विजय मिळविल्याबद्दल बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि.च्या वतीने विजय विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ १९ डिसेंबर रोजी रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे पार पडला. यावेळी बिर्ला कार्बन इंडिया प्रा लि पातळगंगा चे मा.रवींद्र रघुवंशी रसायनी पाताळगंगा चे युनिट हेड, रँडी वॉस कोल ग्लोबल HSC

डायरेक्टर, मिस ऍना करिना ग्लोबल क्व्हए मॅनेजर, मा.महादेव गडगे माजी उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत वडगाव, मा.पूरनिंद कुमार इंजिनियरिंग हेड, संदीप कुमार क्यूसी हेड,विजय अग्रवाल प्रोडक्शन हेड, श्वेता कुमारी सप्लाय हेड, मा.लक्ष्मण मोरे CSR HED, मयुरी शिरोळकर एच आर व त्यांची संपूर्ण टीम या कार्यक्रमाला उपस्थित होती. तसेच माजगाव केंद्राचे केंद्रप्रमुख मा. श्री. परदेशी साहेब सर्व केंद्रातील शिक्षक शाळा व्यवस्थापन समि तीच्या अध्यक्षा,उपाध्यक्ष तसेच वडगाव शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर शिक्षक जाधव सर कवाद मॅडम धायगुडे मॅडम तसेच स्वयंसेविका उपस्थित होत्या. आलेल्या सर्व पाहुण्यांनी शाळेचे व मुलांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व त्याचबरोबर मुलांना खाऊचे वाटप देखील केले या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीमच्या गजरात पाहुण्यांचे स्वागत केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मस्तान बोरगे सरांनी केले तर आभार शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर यांनी मानले.

जाहीर प्रगटन वारसाचे शपथपत्र

मी **विनोद अर्जुनराव गायकवाड** वय- ४८ वर्षे, धंदा- वैदयकीय व्यवसाय, रा. घर नं. ४४, पन्नालाल नगर, नवीन उस्मानपुरा, छ. संभाजीनगर कारणे शपथपत्र लिहुन देतो की, माझे वडिल नामे **अर्जुन सिताराम गायकवाड** यांचे दिनांक २३/०५/२०२१ रोजी निधन झाले असुन त्यांच्या नावावर असलेली मिळकत मौजे- **सातारा, छ. संभाजीनगर येथील गट नं. १६१ पैकी महाराष्ट्र राज्य हिवताप निमृलन सहकारी गृहनिर्माण संस्था, छ. संभाजीनगर मधील घर नं. ०६, मिळकत क्र. ८४५३, खाते क्र. ३११५०७३ ज्याचे क्षेत्र १८६ चौ.मी.** अकृषीक क्षेत्र असुन त्यांच्या मृत्यु पश्चयात आम्ही खालील प्रमाणे वारस आहे.

अ.क्र., वारसदारांचे नाव, मृत्युशी नाते, वय
१. शकुंतला अर्जुन गायकवाड, पत्नी, ७८
२. अनिल अर्जुनराव गायकवाड, मुलगा, ५३
३. सुनंदा अर्जुन गायकवाड, मुलगी, ५१
४. विनोद अर्जुनराव गायकवाड, मुलगा, ४८

वरील प्रमाणे आम्ही वारसदार असुन या व्यतीरिक्त इतरत्र दुसरे कुणीही वारस नाही, निघाल्यास त्याची जबाबदारी माझ्यावर राहील. सदरील मिळकती बाबत कोणत्याही न्यायालया मध्ये मालकी हक्काबात दावा सुरु नाही, असल्यास त्याचे निकालास अधिन राहून सदरील नामांतर होण्यास हरकत नाही. **तरी सदरील ७/१२ वर माझे वडिल यांचे नाव कमी करुन आमचे वारसांचे नाव लावण्यात यावे.**

वरील दिलेली माहिती माझ्या माहिती व ज्ञानानुसार खरी व बरोबर आहे यात काही असत्य निघाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी माझ्यावर राहील. या करीता शासकीय कार्यालय अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार राहणार नाही. करीता हे प्रतिज्ञापत्र लिहुन देत आहे. याबाबत कोणाला काही आक्षेप असल्यास १५ दिवसाच्या आत कळवावा.

प्रतिज्ञक
विनोद अर्जुनराव गायकवाड (मो. नं. ९२७३२०३४९९)
मार्फत
ॲड. वायं. आर. शेळके

जाहीर प्रगटन

मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७३८/२०२४
मोमीन अमतुल वाहिद विरुद्ध निरंक

अर्जदार- १. मोमीन अमतुल वाहिद मोहम्मद शफीउद्दीन, वय ६२ वर्षे, धंदा निल, रा. घर नं.१- १०-१५८. मोलगल्ली, अजिजपुरा, बीड-४३११२२, २.मोहम्मद समियोद्दीन पिता मोहम्मद शफीउद्दीन मोमीन, वय ३१ वर्षे, धंदा- नोकरी, १-१०-१५८. मोलगल्ली, अजपुरा, बीड-४३११२२, ३. मोमीन ओंगेय अम्मारा, ४५ वर्षे, धंदा घरकाम , रा. घर न १-१०-१५८, मोलगल्ली अजिजपुरा, बीड-३११२२, ४.उम्मे रूमान अब्दुल वहाब शेल, वयः ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा ६१४ कर्णिक नगर सोलापूर, पोस्ट एमआयडीसी सोलापूर, ता. जिल्हा सोलापूर

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक, मागणी - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **१. मोमीन मोहम्मद शफियोद्दीन पिता मोईनोद्दीन,** रा घर नं १-१०-१५८, गोलली, अजिजपुरा, बीड-४३११२२ यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मोमीन मोहम्मद शफियोद्दीन पिता मोईनोद्दीन यांचा मृत्यु दि. २२/०१/२०२४ रोजी स घर १-१०-१५८ मोलगल्ली अजिजपुरा, बीड-४३११२२ येथे मयत झालेले असून अर्जदार न १ ही मयताची यांची पत्नी आहे व अर्जदार २ हा मयताचा मुलगा आहे अर्जदार ३ व ४ या अर्जदाराच्या विवाहित मुली आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी हथा कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यात येते. की जर सदर मुक्तीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू संयत **मोमीन मोहम्मद शफियोद्दीन पिता मोईनोद्दीन** रा घर नं १-१०-१५८.. मोलमल्ली, अजिजपुरा, बीड-४३११२२ यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १६ साहे १२ सन २०२४ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०१ / २०२५ आहे.

आदेशावरून.
शिक्का
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
(स्वाक्षरीत)
क.लिपीक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

जाहीरनामा

मा. श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७८६/२०२४
सुभद्रा वि. निरंक
विधीज्ञ- श्री. एस. एस. काळे
मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १) सुभद्राबाई कडाजी गुंदेकर, वय- ७२ वर्षे, धंदा- घरकाम, राहणार- अंबेसावली, ता. जि. बीड. २) भाऊसाहेब कडाजी गुंदेकर, वय- ४० वर्षे, धंदा- शेती, राहणार- अंबेसावली, ता. जि. बीड. ३) धर्मराज कडाजी गुंदेकर, वय ३३ वर्षे, धंदा- शेती, राहणार- अंबेसावली, ता.जि.बीड. ४) धोंडुबाई भ्र. शिवाजीराव भोसले, वय ५८ वर्षे, धंदा- घरकाम राहणार- ईट ता.जि. बीड. ५) शकुंतला भ्र. बाळासाहेब मस्के, वय- ४५ वर्षे, धंदा- घरकाम, राहणार- राक्षसभुवन ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे

ज्याअर्थी मयत नामे कडाजी बाबुराव गुंदेकर राहणार अंबेसावळी ता. जि. बीड हे दिनांक २७/०१/२०२४ अंबेसावळी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क.१ ही मयत नामे कडाजी बाबुराव गुंदेकर यांची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

मयत नामे कडाजी बाबुराव गुंदेकर यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचं हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु **मयत कडाजी बाबुराव गुंदेकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २८/०१/२०२५ आहे.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून.
शिक्का
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
(स्वाक्षरीत)
क.लिपीक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयात विविध अभ्यासक्रम सुरू

११ जानेवारी, २०२५ पर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या माध्यम ातून संगीत क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता दि.२३ डिसेंबर, २०२४ ते ११ जानेवारी, २०२५ या कालावधीत प्रवेश अर्ज ऑनलाइन स्वरूपात करावे, असे भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ग. ल. तरतरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

अर्ज करण्यासाठी www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा https://doaonline.Co.in/LDMIC/ या लिंकवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

संगीत महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता व उपयुक्तता उत्कृष्ट दर्जाची राखण्यासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या सल्लागार मंडळावरती अध्यक्ष म्हणून उषा मंगेशकर, सदस्य म्हणून सुरेश वाडकर, आदिनाथ मंगेशकर तर मयुरेश पै समन्वयक म्हणून आणि कला संचालनालयाचे संचालक संतोष क्षीरसागर सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय बासरी वादन, तबला वादन , सतार वादन, पियानो/कीबोर्ड प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच संगीत निर्मिती व ध्वनी अभियांत्रिकी प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २५ प्रवेश क्षमता आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष असून वार्षिक शुल्क ५४०० रुपये इतके आहे. तसेच सलिल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा महिने कालावधीसाठी शनिवार - रविवार या दिवशी भावसंगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे या अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून वीस हजार रुपये प्रवेश शुल्क असणार आहे.

थोडक्यात

अल्पसंख्याक समितीवर अशासकीय सदस्य नोंदणसाठी अर्जाचे आह्वान

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असून जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी त्या त्या जिल्ह्याचे राज्यसभा, लोकसभा तसेच विधानसभा सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ३ नामवंत संस्थाचे अशासकीय प्रतिनिधी समितीवर सदस्य असणार आहेत. अल्पसंख्यांकासाठी काम करणाऱ्या ३ नामवंत स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन शासनास सादर करण्याकरिता शासन निर्णयानुसार व १५/४/२०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशानुसार अनुसरून इच्छुकांनी अर्ज प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर २०२४ पर्यंत विहित नमुन्यात सादर करण्याचे आवाहन, जिल्हा नियोजन कार्यालय बीडतर्फे करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्ज प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. नाव, पत्ता, जन्म दिनांक, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी .अल्पसंख्यांकांसाठी काम करणा-या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र.(संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा स्वाक्षरीने अधिकृत) अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती. जिल्हास्तरावर अल्पसख्यांक कल्याण समितीवर निवड झालेल्या प्रतिनिधींना, सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नसल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकात नमूद केले आहे.

व्यवसायिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्थसहाय्याबाबत

बीड । प्रतिनिधी

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड कार्यालय मार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून सदर योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत असून त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. सदर योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत दि. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाइन पद्धतीने विहिध मुदतीत अर्ज करण्याच्या आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

बीड येथे एक दिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. सदरील कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न

बीड । प्रतिनिधी

१८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न झाला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी , पोलीस उपअधीक्षक यु.म. कपूर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे, अधिकारी कर्मचारी अल्पसंख्याक नागरिक उपस्थित होते. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी प्रस्ताविकात अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. उपस्थित असलेल्या नागरिकांनी अल्पसंख्याकांबाबत विविध सूचना करुन श्री. स्वामी यांना मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. श्री. चिंचाणे यांनी सुत्र संचलन व आभार प्रदर्शन केले.

बनावट कागदपत्रे तयार करून गोलंग्री येथील मंदिराची जमीन माजी सरपंच पतीने हडपली

उपसरपंच श्रीकांत कवडे यांच्या तक्रारीवरून सात जणांविरुद्ध नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नेकनुर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गोलंग्री येथील हनुमान देवस्थानची गट नंबर २५१ मधील ०९ हेक्टर ०८ आर जमिन बनावट कागदपत्रे व बनावट पीटीआर तयार करून माजी सरपंच पती तात्यासाहेब कवडे यांनी हडप करण्यात आल्याची लेखी तक्रार गोलंग्रीचे विद्यमान उपसरपंच श्रीकांत कवडे यांनी पुराव्यानिशी दिल्यानंतर अखेर खोटे दस्तऐवज तयार करून देवस्थानची ईनामी जमीन हडपल्याप्रकरणी माजी सरपंच पतीसह गावातील ७ जणांवर नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन गुन्ह्याचा तपास सपोनि चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार

नारायण खटाणे करत आहेत.

सदरील इनामी जमिनीचे फेरबदल २०१२ ते २०१७ या कार्यकाळात तत्कालीन सरपंच मनिषा तात्यासाहेब कवडे यांच्या कालावधीत सरपंच पती तात्यासाहेब कवडे यांनी खोटे दस्तऐवज प्रशासनाला सादर करत दिशाभूल करून हनुमान देवस्थानची जमिनीची नोंद उडवुन त्याजागी मारोती मंदिराची जमीन अशी नोंद करण्यात आली.व त्याच जमिनीचा ७/१२ व पीटीआर साम्य करून मारोती मंदिर या नावाने तयार करण्यात आला. विद्यमान उपसरपंच श्रीकांत कवडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कागदोपत्री पुराव्यानिशी नेकनुर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दिल्यानंतर अखेर १) तात्यासाहेब कवडे २)पोपट कवडे ३) संतोष कवडे ४) प्रविण मते ५)शहादेव कवडे ६)सुदाम हिंदोळे ७)कलावती कवडे या सात जणांविरुद्ध दि.१६ डिसेंबर रोजी एफआयआर क्रमांक ०३७६ /२०२४ दाखल झाला असुन भारतीय दंड संहिता १८६० नुसार कलम ४२० , ४६५ ,४६६,४७१,३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कार्तिक वारीसाठीचा मदतनिधी हडपला - पुर्वीपासून गोलंग्री ग्रामस्थ हनुमान देवस्थान जमिनीचा ११ महिन्यांसाठी जाहीर लिलाव करायचे.त्या लिलावातुन आलेली रक्कम पंढरपूरला कार्तिकी वारीसाठी गावातुन जाणाऱ्या लोकांना सहकार्य केले जात असे. परंतु २०१७ मध्ये तत्कालीन सरपंच पती तात्यासाहेब कवडे यांनी बनावट दस्तऐवज तयार करत मारोती मंदिर संस्थानच्या नावाने जमीन हस्तांतरित केल्यानंतर जुन्या सर्व गोष्टी बंद करून या ७ लोकांनीच ०९ हेक्टर ०८ आर जमीन ताब्यात घेऊन खात आहेत. त्याचा मोबदला गावाला किंवा पंढरपूरच्या कार्तिकी वारीसाठी दिला जात नाही.त्यामुळे २०१७ पुर्वीप्रमाणेच ही जमीन गावकऱ्यांच्या स्वाधीन करण्याची मागणी गोलंग्रीचे उपसरपंच श्रीकांत कवडे यांनी ग्रामसभेचे ठराव घेऊन केली आहे.

बोगस पिक विमा भरून शासनाची फसवणूक ७ वर्षांपासून रक्कम लाटली

माजी सरपंच पती तात्यासाहेब कवडे यांनी २०१७ मध्ये हनुमान देवस्थान जमिनीचे मारोती मंदिर नावाने बनावट कागदपत्रे तयार करून २०१७ पासुन आजतागायत खरीप आणि रब्बी दोन्ही पिकांचा विमा भरून उचलला असुन शासनाची आर्थिक फसवणूक केली आहे. विशेष म्हणजे सदरील जमीन शासन निगराणीत असुन तसा निकाल उपविभागीय अधिकारी बीड यांनी दिलेला आहे. तरीही इनाम देवस्थान जमिनीवर संस्थेच्या नावाने नव्हे तर स्वत:चे नाव लाऊन ७ वर्ष पिक विम्याची रक्कम लाटली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव नामदार लोकनेत्या श्रीमती पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल विडा गटाचे जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या या प्रसंगी जि.प.सदस्य भारत (बप्पा) काळे,किरण बिक्कड आदी.

अँड.एम.डि. गदळे यांना भारत सरकारची नोटरी प्रदान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील नामांकित वकील संघाचे शिनियर अँड. एम.डि.गदळे साहेब यांची भारत सरकार नोटरी वकील महणून नियुक्ती झाली आहे. त्यांच्या वडवणी येथील कोर्टासमोरील गाळा.क्र.२० नोटरी कार्यालयाचे उद्घाटन वकील संघाचे अध्यक्ष अँड. तुकाराम आडे यांच्या उपस्थित मध्ये दि.१९/१२/२०२४ रोजी पार पडले. नोटरी कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वसाम ान्य नागरिकांना सेवा देण्याचे कार्य करणार असल्याची माहिती एम.डी गदळे साहेब यांनी दिली. यावेळी उपस्थित वकील संघाचे माजी अध्यक्ष अँड. श्रीराम लंगे, डोंगराचा राजाचे संपादक अनिल वाघमारे, अँड. जानकीराम उजगरे, अँड. विनायक जाधव, अँड सुग्रीव

कदम, मराठवाडा पत्रचे प्रतिनिधी संभाजी लांडे, अँड. सतिश खिरे, अँड. महादेव आडे, शिवकुमार टिकुळे सर लक्ष्मण टिकुळे व वकील संघाचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

लक्ष्मण आण्णांनी विधानसभा निवडणुकीत संजयनगर वासियांना दिलेला शब्द पाळला

संजयनगर येथील रहिवाशांकडून लक्ष्मण आण्णांनचे मानले आभार

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील संजयनगर येथे काही भागात लाईटच्या पोलची आवश्यकता होती संजयनगर येथील भिल्ल वस्तीच्या बाजुला असलेल्या भागात पोल नसल्याने त्या नागरिकांना खुप मोठ्या अंतरावरुन लाईट घ्यावी लागत असे त्यामुळे नागरिकांची गेल्या काही वर्षांपासून गैरसोय होत असे तेथील नागरिक पोल मि ळावे म्हणून सातत्याने मा.आ. लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे पाठपुरावा करीत होते जनेतेच्या मागणीची दखल घेत मा.आ. लक्ष्मण आण्णांनी विज वितरण कार्यालयाकडे पाठपुरावा करुन संजयनगर येथील विद्युत पोलचा प्रश्न मार्गी लावा अशा सुचना केली होती त्यानंतर विज वितरण कार्यालयाने तेथील रहिवाशांकडून

मिटर घेण्यासाठी कोटेशन भरून घेतले होते तरी सुध्दा वेगवेगळे कारणे विज वितरण कार्यालय टाळाटाळ करत होते विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचरा दरम्यान लक्ष्मण आण्णांनी निवडणुकी नंतर तुमचा प्रश्न मार्गी लागेल असा शब्द दिला होता

विधानसभा निवडणुकी दरम्यान संजयनगर वासियांना दिलेला शब्द मा.आ.लक्ष्मण आण्णांनी पाळला आज.दि.१० डिसेंबर रोजी संजयनगर येथील

लाईटचे पोल उभारण्यात येऊन त्यावर विद्युत तार घेऊन संजयनगर येथील रहिवाशांची अडचण काय्यमची मार्गी लावली यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, बाळासाहेब गायकवाड, शेख बाबा, शेख शौकत,.व नागरिक उपस्थित होते अनेक वर्षापासूनची अडचण दुर केली त्याबद्दल नागरिकांनी लक्ष्मण आण्णांनचे आभार व्यक्त केले आहे

मौजे हिंगणी बु येथे श्री विष्णू गुळ उघोग गळीत हंगाम मोळी टाकण्या प्रसंगी मा. तुकाराम मोटे विभागीय क्रष्षी सह संचालक छत्रपती संभाजी नगर, मा.पी. जी. कुलकर्णी माजी तालुका क्रष्षी अधिकारी, क्रष्षी मित्र विठ्ठल घरत, मा. अशोक काळे आत्मा कार्यालय बीड. सौरभ निनाळे, युवा शेतकरी श्रीकांत कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, अजित कुलकर्णी, आनंद कुलकर्णी, रविंद्र चव्हाण, स्वप्निल चव्हाण सदरील कार्यक्रम उपस्थित होते. नैसर्गिक पद्धतीने पिकविलेल्या पाडेगाव ९०५७ स्पेशल गुळ व्हरायटी वाणाची पाहणी, चरक्यात मोळी टाकण्याचा क्रार्यक्रम संपन्न झाला. युवा शेतकरी श्रीकांत कुलकर्णी यांच्या नैसर्गिक गुळ उघोगाला शुभेच्छा दिल्या व करत असलेल्या कामाचे कौतुक करण्यात आले. सलग तिसऱ्या हंगामात यशस्वी पदार्पण केले आहे.

परभणी आणि मस्साजोग प्रकरणी मौजे पाटोदा (म.) येथे रास्ता रोको आंदोलन

पोलिसांना सहआरोपी करून दोन्ही प्रकरणाची सीबीआय मार्फत सखोल चौकशी करावी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परभणी आणि मस्साजोग प्रकरणातील आरोपींसोबत पोलिसांना सहआरोपी करा, तसेच ३०२ चा गुन्हा दाखल करून दोन्ही प्रकरणाची सीबीआय मार्फत सखोल चौकशी करावी यासाठी भिमशक्ती व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुक्यातील मौजे पाटोदा (म.) येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व अंबाजोगाई ग्रामीण ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. परभणी आणि मस्साजोग प्रकरणी मौजे

पाटोदा (म.) येथे मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आम्ही भिमशक्ती सामाजिक संघटना व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आपणांस निवेदन देत आहोत की. परभणी येथे भारतीय संविधानाची विटंबना करून तोडफोड केली. या प्रकरणात पोलीस यंत्रणेकडून प्रचंड दहशत निर्माण केली. अनेकांना अटक करून त्यामध्ये सोमनाथ व्यंकटराव सुर्यवंशी यांचा बळी घेतलेला आहे. शासकीय प्रशासकीय अधिकाऱ्यांनी परभणीत झालेल्या घटनेत गांभीर्याने प्रसारीत झालेले व्हिडीओ पहाव्यात. पोलीस अधिकारी गाड्या फोडत आहेत. तसेच पोलिसाच्या वेशामध्ये अनेक गुंड कार्यकर्त्यावर लाठीचार्ज करीत आहेत. परभणी रेल्वे स्टेशन येथील सेवकसिंग नांवाचा गुंड काठी तुटेपर्यंत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना मारत आहे. त्याचे व्हिडीओ पण पोलिस यंत्रणेने पाहावेत. अशा गुंडावर कठोर कारवाई व ऍट्रासिटी ऍक्टनुसार गुन्हा नोंद व्हावा. संबंधीत पोलिस अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा ३०२ चा गुन्हा दाखल करून या प्रकरणाची तपासणी सी.बी.आय.मार्फत करावी.